# उपसंहार

साहित्यनिर्मितीचे उद्देश हे मानसिक समाधान मिळवणे, इतरांचे मनोरंजन करणे तसेच समाजातील समस्यांचे निराकरण करणे इत्यादी आहेत. या सहित्यनिर्मितीमधे प्राचीन लेखकांसोबत अर्वाचीन लेखकही अग्रेसर आहेत. त्यापैकी एक म्हणे डॉ. जीवन्यायतीर्थ भट्टाचार्य हे आहेत.

आदर्श आणि वास्तव यांचा मेळ योग्य घालून समाज प्रबोधनासाठी साहित्य निर्मिती होते. समाजातील समस्या, रूढी, अंधश्रद्धा, वाईट चालीरीती यांवर हास्याच्या माध्यमातून प्रहार करण्यासाठी प्रहसनांची निर्मिती होते. भरतमुनींनी आपल्या नाटयशास्त्रावरील ग्रंथात प्रहसन व अन्य रूपकप्रकारांची विस्तृत माहिती व लक्षणे दिली आहेत. प्राचीन काळापासून तत्कालीन समस्यांचे निराकरण करण्यासाठी व समाजप्रबोधनासाठी प्रहसनांची निर्मिती होत आहे. अर्वाचीन काळातही ही सुरू आहे.

प्राचीन प्रहसनांचा उद्देश जनसामान्यांच्या हृदयात आणि चेहऱ्यावर हास्य निर्माण करणे, थकलेल्या श्रमिकांना विश्रांती मिळवून देणे हा असला तरी आधुनिक युगातील प्रहसनांची रचना मात्र हास्यनिर्मितीसोबत समाजातील रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, अपप्रवृत्ती यांच्यावर व्यंग्यपूर्ण पद्धतीने आक्षेप घेणे या उद्देशाने होते. या प्रहसनांमधील हास्यनिर्मितीची कारणे वेगवेगळी असतात. केवळ वाचिक किंवा शारीरिक अभिनयाने हे हास्य उत्पन्न होत नाही. समाजातील काही वर्गांमधील अपप्रवृत्तींचे दर्शन, पूर्व घटनेला कलाटणी देणारी घटना इत्यादीमुळे हास्य निर्माण होते.

ग्रामीण, अशिक्षित व्यक्ती पाश्चात्य शिक्षणाने प्रभावित झालेला तरुण वर्ग, लोभी व कृपण सावकार, बुभुक्षू ब्राह्मण, वैद्य, तांत्रिक इत्यादी या प्रहसनांमधील पात्रे असतात. नाटयशास्त्रातील नियमांनुसार आधुनिक प्रहसनांची रचना होत नाही. यामधील अंकांची संख्या वेगवेगळी असू शकते. भरतमुनींच्या नाटयशास्त्रानुसार आधुनिक रूपकांची निर्मिती करणे अशक्य आहे. कारण समाजातील बदलत्या

प्रवाहानुसार सामाजिक घटना, समस्या आणि त्याचबरोबर साहित्य निर्मितीची कारणेही बदलत आहेत.

प्रहसन हा थोडया वेळात, कमी पात्रांसोबत व कमी नेपथ्याबरोबर करता येणारा रूपक प्रकार आहे.

सद्य परिस्थितीतील संस्कृत साहित्य निर्मिती ही प्राचीन रूढ असलेल्या नियमांनुसार न होता बंधने झुगारून होत आहे. श्री. जीवन्यायतीर्थ हे विसाव्या शतकातील आधुनिक लेखक आहेत. ज्यांनी विविध रूपक प्रकारांच्या लेखनाने अर्वाचीन संस्कृत साहित्यात मोलाची भर घातली आहे.

जगातील कोणत्याही भाषेचे जिवंतपण हे त्या भाषेत होणाऱ्या साहित्यनिर्मितीवरुन ठरत असते. संस्कृत ही भाषा सध्या मृत समजली जाते. पूर्वी कालिदास, बाणभट्ट, विशाखादत्त, भास इत्यादी प्राचीन लेखक, कवींच्यानंतर या भाषेत साहित्य लिहिले जात नाही असा लोकांचा गैरसमज झाला आहे. परंतु आधुनिक काळातदेखील या भाषेत उत्कृष्ट प्रतीचे साहित्य निर्माण होत आहे. पूर्वीच्या नियमांना अनुसरून त्याचप्रमाणे काही प्रमाणात पूर्वीची बंधने झुगारूनही सद्यकाळात साहित्यनिर्मिती होत आहे. अशा आधुनिक साहित्यिकांमधे विसाव्या शतकातील कलकत्त निवासी श्री. जीवन्यायतीर्थ भट्टाचार्य हे एक आहेत. त्यांनी आजच्या अर्वाचीन संस्कृत साहित्यात आपल्या मौलिक लेखनाने भर घातली आहे. केवळ एकाच प्रकारचे लेखन नव्हे तर रूपकांचे विविध प्रकार जसे नाटक, भाण, प्रहसन, व्यायोग इत्यादी त्यांच्या लेखणीतून साकार झाले आहेत.

या लघुशोधप्रबंधात श्री. जीव यांच्या १५ प्रहसनांचे समाजशास्त्रातील विविध पैलूंच्या दृष्टिकोनातून विवेचन केले आहे. राजकीय, धार्मिक, लोकसंस्कृती, आर्थिक, कौटुंबिक, विज्ञान या पैलूंच्याद्वारे प्रत्येक प्रहसनावर विवेचन केले आहे. राजकीय दृष्टिकोनातून प्रहसनांचा अभ्यास करीत असताना असे लक्षात येते की जगातील प्रत्येक सत्ता आले स्वातंत्र्य टिकवून दुसऱ्यावर आपले वर्चस्व स्थापन करण्यासाठी धडपडत असते. परंतु भारतात मात्र आपल्या इतकेच दुसऱ्यांच्या स्वातंत्र्याला जपण्यासाठी प्रयत्न सुरु असतात. श्री. जीव यांनी लिहिलेल्या प्रहसनांमधे स्वातंत्र्यपूर्व

काळातील तसेच स्वातंत्र्योत्त काळातील प्रहसनांचाही समावेश आहे. परतंत्र असताना भारतातील लोकांचे आचारविचार, सत्तेपुढे हांजीहांजी करणे, स्वातंत्र्यासाठी मोडेन पण वाकणार नाही असे निरनिराळे दृष्टिकोनही श्री. जीव यांच्या लेखनात दिसून येतात. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील असणाऱ्या त्रुटी, त्यामुळे ओढवणाऱ्या समस्या काही बाबींचा विचार श्री. जीव यांच्या लेखनात आढळतो.

धर्म या मुद्दयावरून जगात सर्वत्र वाद आहेत. याशिवाय त्यातील पंथ, संप्रदाय हे ही मुद्दे लक्षात घेण्यासारखे आहेत. भारताशिवाय इतरत्र कोठेही सर्वधर्मसमभाव ही शिकवण खोलवर रुजलेली दिसून येत नाही. धर्माच्या बाबत असेही लक्षात येते की केवळ जुने ते सोने न म्हणता नव्या आणि चांगल्या मुद्दयांचा विचार करायला हवा. धर्म या मुद्यावर अजूनही भारतात वाद होतात. एकमेकांचा जीव घेण्यासाठी हा एक मुद्दा पुरेसा ठरतो, अशी परिस्थिती असताना एकीकडे सलोखा, बंधुभाव ही तत्त्वेही भारतात आहेत.

या मुद्यावर विश्लेषण करत असताना श्री. जीव यांनी पौराणिक ते आधुनिक सर्व कालखंडातील कथानके घेऊन त्या त्या काळातील सामाजिक परिस्थितीचे उत्तम विवेचन केले आहे. धर्म ही कोणत्याही काळातील महत्त्वाची बाब आहे. परंतु केवळ पुरातन काळात सांगितलेल्या गोष्टींचा विचार न करता आधुनिक युगाप्रमाणे विचार करायला व वागायला शिकले पाहिजे. जुन्या कालबाहय रूढी, प्रथा यांचा त्याग केला पाहिजे, असा निष्कर्ष या मुद्यांचा अभ्यास करताना समोर येतो.

आर्थिक मुद्दयांचा विचार करत असताना असे जाणवते की भारत हा विकसनशील देश आहे. त्यामुळे आर्थिक व्यवस्था जरी महासत्तांइतकी प्रबळ नसली तरी अतिश्रीमंत व अतिगरीब असे दोन गट येथे आहेत. अतिश्रीमंत आपल्या आर्थिक ताकदीच्या जोरावर आपल्या इच्छा आकांक्षाची पूर्ती करू इच्छितात. तर गरीबांची मात्र पैशाअभावी साध्यासाध्या गरजांवची पूर्ती होत नाही. ही आर्थिक विषमता श्री. जीव यांच्या लेखनातून दिसून येते.

समाजातील पूर्वीची वर्णव्यवस्था म्हणजे ब्राह्मणांनी विद्यादान करणे, क्षत्रियांनी संरक्षण करणे, वैश्यांनी व्यापार करणे इत्यादी सर्व मोडीत निघाले आहे. सध्या

समाजातील व्यक्तीची बौद्धिक, शारीरिक कुवत पाहून तिला काम दिले जाते. यामुळे पूर्वापार चालत आलेली अर्थव्यवस्थाही बदलली आहे. २० व्या शतकातील या बदलांचे चित्रण श्री. जीव यांच्या लेखनात काही प्रमाणात दिसून येते.

लोकसंस्कृतीच्या दृष्टिकोनातून श्री. जीव यांच्या लेखनात पुढील मुद्दे लक्षात येतात. समाजातील सामान्य लोकांना परंपरेनुसार जीवन व्यतीत करणे आवडते. त्यांच्या स्वतः व इतरांविषयीच्या दृष्टिकोनातून श्रद्धा, अंधश्रद्धा, रूढी यांचा जन्म होतो. परंतु आधुनिक काळानुसार काही जुया व जाचक प्रथांचा त्याग करणे आवश्यक असते. श्री. जीव यांनी आपल्या लेखनातून अशा अंधश्रद्धा व जाचक प्रथांची खिल्ली उडवली आहे.

श्री. जीव यांनी लोकसंस्कृतीचा विचार आपल्या लेखनात केलेला आढळतो. हुंडा, पुनर्विवाह, स्त्री-पुरुष समानता, समाजातील बहुजनांचे मनोरंजन इत्यादी विविध मुद्यांवर त्यांनी प्रकाशझोत टाकला आहे. प्राचीन रूढी, परंपरा याबाबत विचार करताना मात्र त्यांची दृष्टी बुरसटलेली जाणवते. आधुनिक परंपरा त्यांना मान्य नाहीत.

कुटुंबसंस्थेतील आपलेपणा, जिव्हाळा ही मूल्ये कुटुंबात जपली जात नाहीत. कुटुंबप्रमुख म्हणून आपली कर्तव्ये पार पाडली जात नाहीत. जबाबदाऱ्या सोयिस्करपणे दुर्लक्षिल्या जातात. मात्र कुटुंबातील स्त्रीने असे वागलेले श्री. जीव यांना मान्य नसावे. त्यांच्या लेखनावरून असे जाणवेत की पुरुष जरी कुटुंबप्रमुख असला आणि आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडत असला तरी कुटुंबाला एकत्र ठेवण्याची जबाबदारी ही स्त्रीचीच आहे. तरीही स्त्री हा कुटुंबातील दुर्लक्षित घटक समजला जातो. महत्वाच्या निर्णयांमधे हस्तक्षेत्र करण्याची, आपले मत मांडण्याची परवानगी तिला नाही.

राष्ट्र ही एक संकल्पना आहे. ज्या समुहात निष्ठा आहे. एकता आहे. अशा समुहाला राष्ट्र ही संज्ञा आहे. आपला जन्म जेथे झाला तेथे वेळ पडल्यास, संकटाच्या काळी, आपली गरज असताना मदत करणे ही प्रत्येकाची भावना आहे. श्री. जीव यांनी आपल्या लेखनातून अशी पात्रे साकारली आहेत. जी परस्परविरोधी आहेत. उदा. आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःचे बलिदान करण्यास तयार असणाऱ्या

व्यक्तिरेखा तर दुसरीकडे आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी आपली मातृभूमी, आपले देशबांधव यांचे बळी देण्यास मागेपुढे न पाहणाऱ्या व्यक्तिरेखा इत्यादी.

वैज्ञानिक दृष्टिकोनातून श्री. जीव यांचे एक प्रहसन अभ्यासले आहे. त्यामधे देखील आधुनिकता व पौराणिक श्रद्धा यांचा मेळ घातलेला दिसून येतो. विज्ञानाच्या अतिवापरामुळे पृथ्वीचा नाश होत आहे ही गोष्ट खरी आहे. ज्या देशात वैदिक काळात 'माता भूमिः। पुत्रोऽहम् पृथिव्याः।' असे म्हटले गेले आहे तेथे आज स्वार्थासाठी आणि सत्तेसाठी तिच अस्तित्वावर प्रहार केले जात आहेत.

प्रहसनांमधून व्यक्तिरेखांचे चित्रण करताना कोणत्याही व्यक्तिरेखेच्या स्वभावाचे पूर्ण दर्शन एका छोटया कालावधीच्या रूपकातून होणे अवघड असते. प्रहसनांची पार्श्वभूमी एखादी घटना किंवा एखादी समस्या एवढीच मर्यादित असते. म्हणूनच पात्रांचे स्वभाव संपूर्ण न दिसता त्या त्या पार्श्वभूमीवर ती व्यक्ती कशी वागते, कशी सामोरी जाते हे प्रामुख्याने दिसून येते.

कौटुंबिक दृष्टया विचार करताना श्री. जीव यांच्या प्रहसनांमधे स्त्री व्यक्तिरेखा भारतीय पारंपरिक सहनशील स्त्री प्रमाणे दाखवल्या गेल्या आहेत. आधुनिक आणि बंडखोर स्त्रीची मात्र खिल्ली उडवण्यात आलेली आहे. यावरून त्यांचा रूढीवादी दृष्टिकोन दिसून येतो. पुरुष व्यक्तिरेखांमध्ये कंजुषपणा, स्वार्थीपणा, ईर्ष्या, मत्सर हे भाव जास्त प्रमाणात दिसून येतात. स्त्रीचे मन समाजवून घेण्याचा एकाही पुरुषाचा स्वभाव नाही. हेकेखोरपणा, स्वतःचे खरे करण्याची वृत्ती या पुरुष पात्रांमधे दिसून येते. स्त्री व्यक्तिरेखांचे अध्ययन करताना हे ही लक्षात येते की स्त्री पात्रे आर्थिकदृष्टया स्वतंत्र नाहीत. त्यामुळे आहे त्या परिस्थितीशी झगडत त्यांना कुटुंबात राहावे लागते. परिस्थितीशी लढा देऊन बंधने झुगारुन आत्मोद्धार करणारे एकही स्त्री पात्र या चित्रणात दिसत नाही.

या व्यक्तिरेखांच्या अध्ययनावरून असे लक्षात येते की, समाजातील वाईट विचारांचे चित्रण येथे केले आहे. समाजात काय नको आहे. व्यक्तीच्या स्वभावात कोणते दुर्गण नसावेत हे येथे सूचित केले आहे.

निषेधात्मक रीतीने हे चित्रण करण्यात आले आहे. समाज दोषरहित होण्यासाठी व्यक्ती सुसंस्कारित होण्यासाठी कोणते सद्‌गुण आवश्यक आहेत आणि कोणत्या दुर्गुणांचा त्याग करणे गरजेचे आहे. हे या व्यक्तिचित्रणावरून स्पष्ट होते. श्री. जीव यांनी एकूण व्यक्तिरेखांमधे विविधता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

या लघुशोधप्रबंधाद्वारे संस्कृतच्या अर्वाचीन साहित्यातील विविध विषयांचे संशोधन करण्याची भावी संशोधकांना प्रेरणा मिळेल अशी आशा मी बाळगते. तसेच संस्कृत ही मृतभाषा नसून संस्कृतमधे आधुनिक काळानुसार साहित्यनिर्मिती सुरू आहे, हेही या लघुशोधप्रबंधावरून लक्षात येईल.

# संदर्भग्रंथसूची

## १) मूळ ग्रंथ

१. चण्डताण्डवम् :- संस्कृत साहित्य परिषत् पत्रिका इ.स. १९५५

२. चिपीटक चर्वणम् :- रूपक चक्रम् इ.स. १९५९ प्रकाशक डॉ. जीवन्यायतीर्थ भट्टाचार्य प्र.आ. १९७२.

३. चौर-चातुरियम् - संस्कृत साहित्य परिषत् पत्रिका इ.स. १९५२

४. दरिद्रदुर्दैवम् - सं.सा.प.प. अंक ३१ इ.स. १९६८

५. पुरुषरमणीयम् - सं.सा.प.प. इ.स. १९४८

६. भट्टसंकटम् :- सं.सा.प.प. अंक १ ते ४ इ.स. १९२६

७. योग्य युगल मेलनम् :- प्रणव पारिजात अंक १ व २ (१३८५ बंगाब्द, भाद्रमास)

८. रागविरागम् :- रूपकचक्रम् इ.स. १९५९ प्रकाशक डॉ. जीवन्यायतीर्थ भट्टाचार्य प्र.आ. १९७२.

९. रामनामदातव्य चिकित्सालय :- प्रणवपारिजात पंचम वर्ष अंक १२.

१०. वनभोजनम् - प्रणवपारिजात चतुर्थ वर्ष अंक ९.

११. विवाह विडम्बनम् - संस्कृत प्रतिभा पत्रिका अंक १ इ.स. १९६१.

१२. विधि - विपर्यासम् - आचार्य पंचानन स्मृति ग्रंथमाला तृतीय पुष्प इ.स. १९४९.

१३. शतवार्षिकम् - रूपकचक्रम्

१४. स्वातन्त्र्यसन्धिक्षणम् - स.सा.प.पं.अंक १ ते ५ इ.स. १९५७ ते ५९

१५) क्षुतक्षेमीयम् - रूपकचक्रम्

**संस्कृत ग्रंथ सूची :-**


१) आधुनिक संस्कृत साहित्यानुशीलन् - सं.डॉ. रामजी उपाध्याय

प्रकाशन संस्कृत परिषद

सागर विश्व विद्यालय सागर

प्रथम आवृत्ती

विक्रमसंवत्सर २०२२

(लेख - बीसंवीशती के संस्कृत नाटय की नवीन प्रवृत्तियॉ ले. गुलाबचंद जैन)

२) भवद्ज्जुकम् सरस्वतिसदनं चेति रूपकद्वयम् -

डॉ. मोहन धडफळे

सावित्री प्रकाश पुणे ३०.

प्र.सं. १९९९

३) रूपकचक्रम् - ले. श्री. जीवन्यायतीर्थ भट्टाचार्य

प्रकाशक - श्री. जीवन्यायतीर्थ भट्टाचार्य

८१, सिमला स्ट्रीट कलकत्ता

प्र.सं. १९७२.


**मराठी :-**


१) अर्वाचीन संस्कृत साहित्य - डॉ. श्री. भा. वर्णेकर

प्र. रतनलाल अग्रवाल

सचालक, मॉडर्न बुक स्टोअर्स

अकोला, नागपूर.

प्र.आ. १९६३.

२) भरतमुनींचे नाटयशास्त्र - गोदावरी केतकर

ग.रा. भटकळ

पॉप्युलर प्रकाशन मुंबई

३५ सी ताडदेव रोड, मुंबई

दुसरी आवृत्ती १९६३
प्र.आर. १९२९

३) भारतीय समाज व्यवस्था
डॉ. एम.जी. कुलकर्णी
परीमल प्रकाशन, टिळकपथ,
औरंगाबाद
प्र.आ. १९७५

४) समाजशास्त्र परिचय - प्रो.एन.आर. राजपुत
प्र.गुणवंत मोहाडीकर
अंशुल पब्लिकेशन्स
रेशिमबाग नागपूर
प्र.आ. २००३.

५) संस्कृत साहित्याचा इतिहास - भाग ५ दशरूपके
ले.डॉ. सुरुची पांडे
प्र. संस्कृत संस्कृती संशोधिका
ज्ञानप्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे ३०.
प्र.आ. २००३

**हिंदी :-**

१) आधुनिक संस्कृत साहित्य :- डॉ. हीरालाल शुक्ल
रचना प्रकाशन
अलाहाबाद

२) आधुनिक संस्कृत नाटक - नये तथ्य नया इतिहास - डॉ. रामजी उपाध्याय
चौखंबा विद्याभवन, वाराणसी

द्वि.आ. १९९६.

३) दशरूपकम् (धनंजयविरचित) - डॉ. राजबली पाण्डेय
उर्मिला पब्लिकेशन्स
सी-३०, संतोषी माता मंदिर
सर्वोदय गल्ली, पश्चिमी करावलनगर
दिल्ली.
प्र.सं. १९९२

४) बीसवी शताब्दीके संस्कृत प्रहसनोंका अध्ययन - डॉ. नरेंद्रनाथ यादव
विजयप्रकाशन मंदिर,
बी २१/७६ कमच्छा, वाराणसी
प्र.सं. १९९१.

५) भारतीय नाटयशास की परंपरा और दशरूपक - हजारीप्रसाद द्विवेदी,
(धनिक की वृत्तिसहित ) पृथ्वीनाथ द्विवेदी
राजकमल प्रकाशन
८, फैजबाजार दिल्ली ६.
प्र.सं. १९६३.

६) संस्कृत साहित्य के इतिहास की आलोचनात्मक रूपरेखा -
डॉ. कृष्णकांत त्रिपाठी,
प्रो. गदाधर त्रिपाठी
कमला प्रकाशन
स्वरूप नगर, कानपूर
प्र.सं. १९७१
वा. सं. १९७४

७) संस्कृत साहित्यमे प्रहसन - डॉ. राधावल्लभ त्रिपाठी
नमिता अग्रवाल
अक्षयवट प्रकाशन

अलाहाबाद

प्र.सं. १९९२

८) संस्कृत साहित्यमें राष्ट्रीय भावना - डॉ. हरिनारायण दिक्षित

देववाणी परिषद्

६, वाणी विहार नवी दिल्ली

प्र.आ. १९८३.

**इंग्रजी :-**

1) Prahasanas in Sanskrit Literature & Kerala stage – Dr. K.K. Malathi Devi

Nag Publishers

Jawahar Nagarm, Delhi 110007.

F.E. 1995.

3) The Sanskrit Drama – in it's origin Development, Theroy & Practice – A.B. Keith.

**कोश वाङ्मय :-**

१) नाटयशास्त्र विश्वकोश खंड - १ ले. राधावल्लभ त्रिपाठी

प्रतिभा प्रकाशन प्र.सं. १९९९

२) मराठी विश्वकोश खंड १० प्र.तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

प्र.आर. १९८२

२) भारतीय संस्कत कोश खंड ५ पं. महादेवशास्त्री जोशी

प्र.आ. १८९०

३) संस्कृत वाङ्मय कोश - ग्रंथकार खंड - डॉ. श्री. भा. वर्णेकर

प्र. भारतीय भाषा परिषद्

३६-ए शेक्सपिअर सरणी

कलकत्ता ७०००१७.

४) संस्कृत वाङ्मय कोश - ग्रंथ खंड - डॉ. श्री. भा. वर्णेकर

प्र.भारतीय भाषा परिषद्

३६ ए, शेक्सपिअर सरणी

कलकत्ता ७०००१७.

891.2
KUL
T15586